वर्ष : ०५ | अंक: ११ | मुंबई, मंगळवार ५ फेब्रुवारी २०१९ ते ११ फेब्रुवारी २०१९ | पृष्ठ: ४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021 R.N.I. No. MAHMAR/2014/60133 Website: www.policebatmipatra.com / www.policebatmipatra.in

**राजकिय प्रवास**

- पहिली लोकसभा निवडणूक १९६७ मध्ये जिंकली
- जॉर्ज फर्नांडिस यांनी १९९४ ला समता पार्टी एकत्रित केली
- १९९५ ला भारतीय जनता पार्टीबरोबर राजकीय एकी केली
- १९९८ ते २००४ या कालावधीत तट रक्षक मंत्री होते
- शेवटच्या वेळी ते ऑगस्ट २००९ ते जुलै २०१० मध्ये राज्यसभा सांसद होते





# अखेर झाला समतावादी युगाचा शेवट

साथी जॉर्ज फर्नांडिस गेले आणि या 'बंद सम्राटा'च्या सामर्थ्याची चर्चा मीडियात सुरू झाली. क्षणभर मनात विचार आला की, फर्नांडिस गेले १० ते १२ वर्षे अल्झायमरने आजारी नसते आणि त्यांनी खरोखरच आपली बंद करण्याची ताकद पणाला लावून मुंबई ठप्प करण्याचा प्रयत्न केला असता, तर आज पंचविशीत असलेल्या पिढीने...

सविस्तर पृष्ठ ३ वर

2 → जिंकणार कोण, अण्णा की मोदी?

मराठा क्रांती मोर्चा पुन्हा फुंकणार रणशिंग ← 4



## Budget 2019: निवडणुकीच्या तोंडावर लोकप्रिय घोषणांचा पाऊस

# शेतकरी, नोकरदार, कामगार सर्वांनाच केले खुष!



नवी दिल्ली - मोदी सरकारच्या या कार्यकाळातील शेवटचा अर्थसंकल्प संसदेत सादर करण्यात आला. निवडणुकीच्या तोंडावर सादर करण्यात आलेल्या या अर्थसंकल्पात जवळपास सर्वांसाठी लोकप्रिय घोषणांची बरसात करण्यात आली. प्रामुख्याने नोकरदार आणि मध्यमवर्गाला ५ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करणे आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी ठरावीक उत्पन्नाची घोषणा सरकारने केली.

**मुद्दे खालीलप्रमाणे...**

१. ५ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कुठलाही कर नाही. ही मर्यादा अडीच लाख होती, ती थेट दुपटीने वाढवली.
२. ८० सी अंतर्गत १.५० लाखांपर्यंत गुंतवणूक केल्यास ५ लाख ६ १.५० लाख मिळून साडे सहा लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त असेल.
३. पीएम किसान योजनेअंतर्गत छोट्या शेतकऱ्यांच्या (२ हेक्टरी जमिनीचे मालक) खात्यात प्रत्येक वर्षी ६ हजार रुपये
४. २१ हजारपर्यंत पगार असलेल्या असंघटीत कामगारांना ७ हजार रुपये बोनस देण्याची घोषणा. १० कोटी असंघटीत कामगारांना मिळणार लाभ.
५. प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनाः १५ हजार रुपयांहून कमी उत्पन्न असलेल्या कामगारांना ६० वर्षांनंतर दरमहा ३ हजार रुपये पेन्शन देणार
६. रेल्वेसाठी ६४ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद, ७. संरक्षण क्षेत्रासाठी प्रथमच तब्बल ३ लाख कोटी रुपयांहून अधिक तरतूद
८. २० लाख रुपयांपर्यंतच्या ग्रॅच्युईटीवर कर नाही.

## कोणाला काय मिळाले...

**प्राप्तीकर**

**तीन कोटी करदात्यांना फायदा मिळणारी घोषणा**

५ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर टॅक्स लागणार नाही. तसेच दीड लाखांपर्यंतची गुंतवणूकही करमुक्त असल्याने ६.५ लाखांपर्यंत हा लाभ मिळू शकतो. स्टँडर्ड डिडक्शन पूर्वी ४० हजार रुपये होते. आता ५० हजार रुपये करण्यात आले. बँक आणि पोस्टात जमी केलेल्या रकमेवरही मिळालेल्या व्याजावर टीडीएसमधील सूट १० हजाराहून वाढून ४० हजार रुपये केली. भाड्यातून मिळणाऱ्या २.४० लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर टीडीएस लागणार नाही. पूर्वी ही मर्यादा १.८० लाख रुपये होती. दोन कोटींपर्यंतच्या कॅपिटल गेनवर गुंतवणुकीची मर्यादा एक ऐवजी दोन घरांची केली आहे. ही सूट जीवनात एकदाच मिळेल. अफोर्डेबल हाऊसिंग स्कीममध्ये घर बूक करत असाल तर त्याच्या व्याजावर मिळणारी सूट ३१ मार्च २०२० पर्यंत वाढवली आहे. दुसरे घर असल्यास त्याच्या भाड्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश दोन वर्षे करात केला नाही तरी चालेल.

**रेल्वे**

पीयूष गोयल यांनी सांगितले की, रेल्वेमध्ये विकास कार्यांसाठी १.५८ लाख कोटींची तरतूद केली आहे. गेल्या वर्षी सरकारने त्यासाठी १.४८ लाख कोटी रुपयांची तरतूद केली होती. ब्रॉडगेज नेटवर्कवर सर्व मानवविरहित क्रॉसिंग संपल्या आहेत. देशात तयार झालेली सेमी हायस्पीड ट्रेन वंदे भारत एक्सप्रेस लोकांना जागतिक दर्जाच्या प्रवासाचा अनुभव देईल. मेघालय, त्रिपुरा आणि मिझोरम प्रथमच रेल्वेच्या नकाशावर झळकले आहेत.

**कर्मचारी..**

सातवा वेतन आयोगाचा रिपोर्ट आल्यानंतर त्याच्या शिफारशी लवकरात लवकर लागू केल्या जाणार आहेत. नवीन पेन्शन स्किममध्ये सरकारचे योगदान ४ टक्क्यांनी वाढून १४ टक्के केले आहे. जे लोक २१ हजार रूपये महिना कमवतात, त्यांना बोनस मिळणार आहे. हा बोनस ७ हजार रूपये असेल. ग्रॅच्युटीची मर्यादा १० लाखावरून वाढवून २० लाख रूपये केली आहे. प्रत्येक श्रमिकांसाठी किमान पेन्शन १ हजार रूपये करण्यात आले आहे.

**कामगार..**

कामगारांनाही सामाजिक सुरक्षा देण्याची गरज आहे. आयुष्मान भारत आणि जीवन ज्योती विमा आणि सुरक्षा

उर्वरित पृष्ठ 2 वर

# सरकारने अण्णांच्या जीवाशी खेळू नये

## शिवसेनेचा उपोषणाला पाठिंबा; सरकारला आवाहन

**गेल्या पाच दिवसांपासून उपोषणास बसलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या उपोषणाला शिवसेनेने पाठिंबा जाहीर केला आहे. अण्णांच्या आंदोलनाची सरकारने दखल घ्यावी. अण्णांचा जीव महत्त्वाचा असून सरकारने त्यांच्या जीवाशी खेळू नये असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले आहे.**



अण्णा हजारेंच्या उपोषणाचा पाचवा दिवस असून त्यांची प्रकृती खालावत असल्याबद्दल उद्धव यांनी चिंता व्यक्त केली आहे. पंतप्रधानांनी अण्णांच्या आमरण उपोषणाला शुभेच्छा देणारे पत्र पाठवावे हा प्रकार संतापजनक , तितकाच हास्यास्पद असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. 'अण्णांचा लढा भ्रष्टाचारविरोधी आहे व देशाचीच ती समस्या आहे. पण आमरण उपोषण करुन प्राणत्याग करण्यापेक्षा रस्त्यावर उतरुन लढा द्यावा व देशाला जाग आणावी. सध्या देशातील जनतेला गुंगीचे औषध देण्यात आले असून जनतेला त्या गुंगीतून बाहेर काढणे गरजेचे आहे. अण्णांनी नव्या क्रांतीसाठी जयप्रकाश नारायण यांची भूमिका स्वीकारावी.

# जागतिक कर्कदिनाच्यादिवशी आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टच्यावतीने ग्रामीण भागात ठिकठिकाणी 'व्यसन सोडा, कुटुंब वाचवा' मोहिम राबवण्यात आली

जागतिक कर्कदिनादिवशी आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टच्या वतीने ग्रामिण भागात ठिकठिकाणी लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी 'व्यसन सोडा, कुटुंब वाचवा' असा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी आश्रय ट्रस्ट संस्थापक यांच्यावतीने तंबाकु जन्य पदार्थ व इतर व्यसन सोडण्यासाठी नागरिकांमध्ये बैठक घेऊन व्यसन सोडल्याने होणारे फायदे लोकांना समजवण्यात आले. मेमोग्राफी या आधुनिक उपकरणाने सज्ज असलेली नवीन टेकनोलोजीच्या बसमार्फत महीलांसाठी मेमोग्राफी करण्यात आली. प्रत्येक मनुष्याने कर्करोगापासून दुर राहण्यासाठी कोणत्या प्रकारची खबरदारी घ्यायची यावर सुचना देण्यात आल्या. यावेळी आश्रय ट्रस्टचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.





# जागतिक कर्कदिनाच्या दिवशीच सुप्रसिद्ध अभिनेते रमेश भाटकर यांचे कर्करोगाने निधन

**मुंबई–** ज्येष्ठ अभिनेते रमेश भाटकर यांचे निधन झाले. कर्करोगाने त्रस्त असल्याने गेल्या काही काळापासून त्यांच्यावर मुंबईतील एलिझाबेथ रूग्णालयात उपचार सुरू होते. वयाच्या ७० व्या वर्षी त्यांनी सोमवारी अखेरचा श्वास घेतला. रमेश भाटकर यांनी १९७५ मध्ये 'अश्रुंची झाली फुले' नाटकात भूमिका केली. 'कमांडर' आणि 'हॅलो इन्स्पेक्टर', दामिनी या मालिकांतील त्यांच्या भूमिका लोकप्रिय ठरल्या होत्या. 'हॅलो इन्स्पेक्टर'मधील त्यांची भूमिका वाखाणण्याजोगी होती. मराठी रंगभूमीबरोबरच अनेक मराठी चित्रपटातही त्यांनी भूमिका साकारल्या. 'द ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर' या हिंदी चित्रपटातही त्यांची महत्त्वाची भूमिका होती.

रमेश भाटकर यांचे वडील स्नेहल (वासूदेव) भाटकर गायक-संगीतकार होते. रमेश यांचा जन्म ३ ऑगस्ट, १९४९ मध्ये झाला होता. त्यांनी १९७७ मध्ये मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले. ३० वर्षांहून अधिक काळ ते अभिनय क्षेत्रात कार्यरत होते.

रमेश भाटकर हे मराठी सिनेसृष्टीतील नावाजलेले अभिनेते. रंगभूमीवरूनच त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. अश्रूंची झाली फूले हे त्यांचे नाटक चांगले गाजले. त्याचबरोबर, राहू केतू, मुक्ता, केव्हा तरी पहाटे, अखेर तू येशीलच यांसारखी त्यांची अनेक नाटके गाजली.



'तू तिथे मी' आणि 'माझे पती सौभाग्यवती' या मालिकांमध्ये ते दिसले होते. वयाच्या पन्नाशीनंतरही त्यांचा कामातील आणि अभिनयातील जोश कायम होता.

'चांदोबा चांदोबा भागलास का' (१९७७) या चित्रपटाद्वारे रमेश यांनी मराठी सिनेसृष्टीत पाऊल ठेवले. पुढे त्यांनी 'अष्टविनायक,' 'आपली माणसं,' 'दुनिया करी सलाम' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये काम केले. त्यांनी जवळपास ९० हून अधिक मराठी चित्रपटांमध्ये काम केले.

# जागतिक कर्क दिनानिमित्त पोलिसांची धडक कारवाई

**कासा व पालघर पोलिसांनी तंबाखुजन्य पदार्थ केले जप्त**

**ठाणे-** दि.२ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ७ वाजता आरोपीने आपसांत संगनमत करून त्याच्या ताब्यातील वाहनात २४ हजार रुपये किंमतीचे विमल पान मसल्याचे २०० पॅकेट, २) सहा हजार किंमतीचे व्ही१-टोबॅकोचे २०० पॅकेट. ३) २६ हजार रु किंमतीचे शुद्ध प्लस पान मसाल्याचे २०० पॅकेट, ४) ६, ४०० रु एक प्लस चोईंग टोबॅको २०० पॅकेट ५) ४ लाख रु किंमतीची राखाडी रंगाची स्विफ्ट कार असा एकूण ४,६२,४००/- रु किंमतीचे अन्नपदार्थ के मानवी आरोग्यास अपायकारक आहे. त्यावर महाराष्ट्रशासनाने बंदी केलेली आहे. माहित असतानाही शासकीय आदेशाची अवहेलना करून वाहतुक करून घेऊन जात असताना मिळून आला. सदरची कारवाई ही अनंदराव काळे, सपोनि कासा पोलिस ठाणे यांनी व कासा पोलिस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी यांनी केली.



तसेच ३ फेब्रुवारी २०१९ रोजी गुन्हे प्रतिबंधक पथकाचे पोउनि थोरा आणि सपोउनि सुरेंद्र शिवदे असे वसई सेक्टर परिसरात गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना वालिव पोलिस ठाण्याच्या हद्दीत वसई फाटा येथे शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखुजन्य उत्पादनांची दोन दुकानांमध्ये विक्री केली जात असल्याबाबत माहिती मिळाल्याने निदा जनरल स्टोर्स येथे छापा टाकून मोहम्मद इसरार खान (३४), प्रेमपुरी गोस्वामी (५५), यांच्याकडून २२,३५२/- व रु. २१, ८२७ ची प्रतिबंधीत तंबाखूजन्य उत्पादने व प्रतिबंधीत सुगंधी सुपारी असा एकूण ४४,१७९ चा माल हस्तगत करण्यात आला. सदरची कारवाई ही पोलिस अधीक्षक पालघर यांच्या गुन्हे प्रतिबंधक पथकाचे पोउनि मल्हार थोरात आण सपोउनि सुरेंद्र शिवदे यांनी केली आहे.



# केंद्राने सादर केलेला अर्थसंकल्प लोककल्याणकारी -मुख्यमंत्री

***मुंबई-* देशातील सर्वसामान्य माणूस हाच केंद्रबिंदू ठेवून केंद्र सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प हा अशा घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठीच्या प्रामाणिक प्रयत्नांचा जाहीरनामाच आहे. तसेच शेतकरी-कष्टकरी, मध्यमवर्गीय नोकरदार, महिला आणि ग्रामीण जनतेच्या विकासाशी असलेली सरकारची बांधीलकीच त्यातून प्रतिबिंबित होत आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.**

या लोककल्याणकारी अर्थसंकल्पाचे स्वागत करताना मुख्यमंत्री म्हणतात, असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी तीन हजार रुपये पेन्शन असो किंवा शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपयांचे अर्थसहाय्य, अशा निर्णयातून देशातील सरकारने सर्वसामान्य घटकांच्या उत्थानातून आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचा निर्धार केल्याचे दिसून येत आहे. नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा



लागणाऱ्या शेतकऱ्यांना दोन टक्के व्याजाची सवलत तर वेळत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अतिरिक्त तीन टक्क्यांचा लाभ देण्याचा निर्णय ऐतिहासिक आहे.

मनरेगासाठी अधिकची तरतूद केल्याने ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. गोमातेचा सन्मान करणाऱ्या राष्ट्रीय कामधेनू आयोगाच्या स्थापनेमुळे दुधाचे उत्पादन वाढण्यासोबतच शेतकऱ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. देशातील एक लाख गावे डिजिटल करण्याचा उपक्रम हा ग्रामविकासाला डिजिटल सक्षमीकरणाचा आयाम देणारा आहे. आयकर उत्पन्नाची मर्यादा पाच लाखापर्यंत वाढविल्यामुळे नोकरदार वर्गाला मोठा दिलासा मिळाला असून देशाच्या विकासात योगदान देतानाच ते अधिकाधिक बचतही करु शकतील.

महिलांना ८ कोटी एलपीजी जोडणी मोफत देण्याच्या योजनेचा आतापर्यंत ६ कोटी महिलांना लाभ झाला असून मार्च अखेरपर्यंत उर्वरित दोन कोटी जोडण्या दिल्या जातील. प्रसुती रजेचा कालावधी २६ आठवडे करण्याच्या निर्णयातून माता आणि बालसंगोपनाबाबतची सरकारची कटिबद्धता सिद्ध झाली आहे. मुद्रा योजनेचा ७५ टक्के महिलांनी घेतलेला लाभ ही अभिमानास्पद बाब असून समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचावा यासाठी निती आयोगाच्या समितीची स्थापना निश्चितच परिणामकारक ठरेल, अशा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

# प्रदूषण, प्लास्टिकमुळे जलचरांची घुसमट

## *गेल्या वर्षभरात ३७ सस्तन जलचर मृतावस्थेत समुद्रकिनारी; माशांच्या पोटात प्लास्टिकचे अंश*

**मुंबई-** मुंबईलगतच्या समुद्र किनारपट्टीवर वाढते जलप्रदूषण आणि पाण्यात मोठ्या प्रमाणात पसरलेल्या प्लास्टिकमुळे सागरी जलचरांचीही घुसमट वाढू लागली आहे. मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांवर गेल्या वर्षभरात सुमारे ३७ सस्तन जलचर मृतअवस्थेत वाहून आले होते. गेल्या चार वर्षांच्या तुलनेत ही संख्या अधिक आहे. शिवाय 'केंद्रीय समुद्री मत्स्यिकी संशोधन संस्थे'ने (सीएमएफआरआय) केलेल्या अभ्यासात मुंबईच्या सागरी परिसंस्थेतील माशांच्या पोटात प्लास्टिक आढळून आले आहे. त्यामुळे सागरी जीवांना धोका निर्माण होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



खाड्या आणि नाल्यांमधून समुद्रात वाहत जाणारे प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि प्लास्टिकमुळे मुंबईलगतच्या किनारपट्टीवर जलप्रदूषण वाढले आहे. 'केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळा'च्या (सीपीसीबी) अहवालानुसार गेल्या वर्षी राज्यातील प्रदूषित नद्यांमध्ये २०१७ च्या तुलनेत वाढ होऊन मिठीच्या प्रदूषणाची सर्वसाधारण पातळी सुरक्षा मर्यादेपेक्षा २५ पट अधिक झाली आहे. तर 'सीएमएफआरआय'च्या अभ्यासात देशातील इतर किनारपट्टीच्या तुलनेत मुंबईलगतच्या समुद्राच्या पोटात सर्वाधिक प्लास्टिक आढळून आले आहे. मुंबईतील समुद्रात प्रति चौरस किलोमीटर क्षेत्रात १३१.८५ किलो प्लास्टिक आढळून आले आहे. हेच प्रमाण कोचीमध्ये १.५५ किलो, विशाखापट्टण येथे ४.९५ आणि रत्नागिरीमध्ये ७३.१६ किलोच्या घरात आहे. या प्रदूषणाने सागरी जलचरांचा जीव धोक्यात येऊ लागला आहे.

मुंबईच्या किनाऱ्यावर २०१८ मध्ये डॉल्फिन, व्हेल, पॉरपॉईस यासारखे सुमारे ३७ समुद्री सस्तन जीव वाहून आल्याचे कांदळवन संरक्षण विभागाच्या अहवालामधून समोर आले आहे. मात्र २०१५ मध्ये ही संख्या १२, २०१६ मध्ये २१ आणि २०१७ मध्ये २७ एवढी होती. त्यामुळे २०१८ मध्ये यात वाढ झाल्याचे दिसते. यातील सर्वच जलचरांचा जीव प्रदूषणामुळे गेला नसला तरी काही जीव प्रदूषण आणि मानवनिर्मित कारणांमुळे मारले गेल्याचे समोर आले. गेल्या वर्षी डहाणू आणि जुहू येथील किनाऱ्यावर मृत्यावस्थेत सापडलेल्या पॉरपॉईजच्या शरीरावर मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या जाळीच्या दोरीचे वळ आढळून आले होते. मच्छीमारांनी समुद्रात फेकून दिलेल्या जाळ्यांमध्ये कासव, पॉरपॉईजसारखे जीव अडकतात. त्यातून बाहेर पडणे शक्य न झाल्याने त्यांचा मृत्यू होतो.

# उद्योगासाठी दिलेली सरकारी जमीन इमारतींसाठी खुली

**मुंबई-** औद्योगिक वापरासाठी मंजूर केलेल्या आणि उद्योग सुरू नसल्याने पडून असलेल्या सरकारी जमिनी अधिमूल्य (प्रीमियम) आकारून इतर कारणासांठी वापरण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे बंद उद्योगांच्या जागा आता बिल्डरांना निवासी-व्यावसायिक इमारतींच्या बांधकामासाठी खुल्या होणार आहेत. मुंबई, ठाणे परिसरातील व लगतच्या रायगड भागातील अनेक उद्योगांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.



उद्योगांसाठी ठिकठिकाणी सरकारी जमिनी देण्यात आल्या. काही ठिकाणी उद्योग सुरू होऊन बंद पडले वा त्यांचे स्थलांतर झाले. तर काही ठिकाणी ते नीट उभेच राहू शकले नाहीत. पूर्वी शहरांच्या वेशीवर किंवा थोडे दूर असलेल्या अशा जमिनी आता बऱ्याच ठिकाणी शहरांच्या हद्दीत आल्या. त्यांच्या अवतीभवती मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले असताना या जमिनी औद्योगिक वापराच्या असल्याने त्यावर विकास करता येत नव्हता.

विशिष्ट प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या सरकारी जमिनीचा वापर अन्य कारणासाठी मंजूर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील प्रस्तावांना सरकारची मान्यता घेणे आवश्यक राहणार आहे.

# साडेपाच लाख गर्भवतींना १८८ कोटींची मदत

**मुंबई-** भारतातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील बहुसंख्य महिलांना गर्भावस्थेत तसेच प्रसूतीनंतर शारीरिक क्षमता नसतानाही रोजगारासाठी काम करावे लागत असल्यामुळे अशा महिला कुपोषित राहून त्याचा परिणाम नवजात बालकांवरही होतो. अशा महिलांना काम करावे लागू नये आणि पोषण आहारही मिळावा यासाठी प्रधानमंत्री मातृवंदना योजना सुरू करण्यात आली असून, महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात तब्बल साडेपाच लाख महिलांना या योजनेतून १८८ कोटींची मदत देण्यात आली आहे. एवढ्या प्रभावीपणे ही योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. देशातील व राज्यातील अर्भकमृत्यू, बालमृत्यू व मातामृत्यूची समस्या सोडविण्यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या. मात्र आर्थिक कारणाअभावी ठोस उपाययोजना न झाल्यामुळे अर्भकमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण फारसे कमी करण्यात सरकारला यश येत नव्हते. यावर उपाय म्हणून केंद्र शासनाने 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान' व 'प्रधानमंत्री मातृत्व अनुदान'अशा दोन योजना सुरू केल्या असून महाराष्ट्रात या दोन्ही योजना आरोग्य विभागाने सक्षमपणे राबविल्यामुळे अर्भकमृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण हळूहळू कमी होऊ लागले आहे. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत महाराष्ट्रात २०१६ ते २०१८ या काळात १७ लाख २५ हजार ४०३ गर्भवती महिलांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली असून यातील ६९,२४६ अतिजोखमीच्या महिलांवर रुग्णालयात योग्य ते उपचार करण्यात आले. साडेतीन लाख गर्भवती महिलांची अल्ट्रासोनोग्राफी करण्यात आली. दरमहा ही तपासणी योजना राबविण्यात येत असून या अंतर्गत मोफत चाचण्या, उपचार, गर्भावस्थेच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात सोनोग्राफी, लोहयुक्त गोळ्या, कॅल्शियमच्या गोळ्या तसेच प्रसूतीनंतर पूरक आहाराची व्यवस्था केली जाते. मात्र, आदिवासी व दुर्गम भागातील महिला रोजगार बुडण्याच्या भीतीपोटी अनेकदा तपासणी व उपचारासाठी येण्यास टाळाटाळ करतात हे लक्षात आल्यामुळे 'प्रधानमंत्री मातृवंदना योजना' सुरू करण्यात येऊन बुडालेल्या रोजगाराची भरपाई म्हणून तीन टप्प्यात पाच हजार रुपये देण्याचा निर्णय गेल्या वर्षी घेण्यात आला.



# सीसीटीव्हीद्वारे शहरावर नजर



**मुंबई- पोलिसांनी सुचवलेल्या जागी शासनसाडेपाच हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार आहे. त्यामुळे शहरातील शासकीय सीसीटीव्हींची संख्या दहा हजारांवर जाईल. हे कॅमेरे २४ तास आपल्या टप्प्यातील हालचालीवर करडी नजर ठेवतील. त्यामुळे पोलिसांना संपूर्ण शहरावर नजर ठेवता येणार आहे. २६/११ हल्ल्यानंतर शहरात सीसीटीव्हींचे जाळे उभारावे, त्याआधारे पोलीस, वाहतूक नियंत्रण कक्षातून शहरात एकाच वेळी नजर ठेवावी, हा विचार पुढे आला. पहिल्या टप्प्यात सुमारे साडेचार हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची उभारणी केली गेली. मुंबई पोलीस दलातून देण्यात आलेल्या माहितीनुसार प्रतिबंधात्मक आणि गुन्हा किंवा एखादी घटना घडल्यानंतरच्या चौकशी वा तपासात सीसीटीव्हींचा फायदा होतो.**

सीसीटीव्हीत आपली कृती कैद होईल, पोलीस आपल्यापर्यंत पोहोचतील या भीतीने अनेक गुन्हेगार, समाजकंटक माघार घेतात. तसेच गुन्हा केल्यानंतर तेथून निसटलेल्या आरोपींची ओळख, त्याने निवडलेली दिशा आदी तपासाच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती मिळते. सीसीटीव्हींच्या मदतीने आजवर असंख्य गुन्ह्यांची उकल पोलिसांनी केली आहे. या उपक्रमाच्या पुढल्या टप्प्यात शहरात आणखी साडेपाच हजार सीसीटीव्ही बसविण्यास मंत्रिमंडळाने अलीकडेच परवानगी दिली. प्रत्यक्षात हे वाढीव कॅमेरे कुठे बसवायचे यासाठीचे नियोजन खूप आधीपासून सुरू होते. पोलीस ठाण्यांच्या पातळीवर आपापल्या हद्दीत कुठे कॅमेरे बसणे जास्त उपयुक्त ठरेल याची माहिती घेण्यात आली. हद्दीतील संवेदनशील वास्तू, गर्दीच्या ठिकाणांसोबत महिला- बालकांविरोधातील गुन्हे, सोनसाखळी चोरी, वाटमारी, अपघात आदी गुन्हे घटना वारंवार घडणारी ठिकाणे निवडण्यात आली. दुसऱ्या टप्पा पूर्ण होताच शहरातील सीसीटीव्हींचे जाळे अधिक भक्कम होईल. ज्या ठिकाणी सीसीटीव्हींची आवश्यकता आहे त्या ठिकाणांची निवड केल्याचे राज्याचे पोलीस महासंचालक दत्ता पडसलगीकर यांनी सांगितले.

निवृत्त सहायक आयुक्त वसंत ढोबळे या उपक्रमात पोलीस दलाला मदत करत आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील प्रत्येक मुख्य रस्त्याला अनेक गल्ल्या येऊन मिळतात. त्या प्रत्येक चौकावर दुसऱ्या टप्प्यात सीसीटीव्ही उभारले जाणार आहेत.

गल्लीबोळात गुन्हे करून आरोपी मुख्य रस्त्यावर येतो. तो, त्याच्या मार्गक्रमणाची दिशा कैद व्हावी, अचूक माहिती मिळावी हा त्यामागील उद्देश आहे.

# कोल्हापूर जिल्हा रहिवाशी विकास मंडळ आयोजित कोल्हापूर महोत्सव

जगभरात प्रसिद्ध असलेला कोल्हापूरी खाद्य महोत्सव रंगणार मिरा भाईन्दरमध्ये...

कोल्हापूर आणि तेथील खाद्यसंस्कृती खवय्यांना नेहमीच आकर्षित करत असते. त्यामुळेच कोल्हापुरी खाद्यपदार्थाशी त्यांचे एक वेगळेच नाते निर्माण झाले आहे. हे नाते अधिक घट्ट व्हावे आणि खास कोल्हापुरी चव मिरा भाईन्दर आणि मुंबईकरांना चाखता यावी यासाठी ८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी पर्यंत असा ३ दिवसीय कोल्हापूरी महोत्सव मिरा भाईन्दरमध्ये रंगणार आहे.

या महोत्सवात कोल्हापूरमधील

गावरान मिसळ, अस्सल चवीचा तांबडा-पांढरा रस्सा

खांडोळी

मटण लोणचे

मटण-चिकन थाळी पिठलं भाकरी, अख्खा मसूर

कोल्हापुरी भेळ

अशा खाद्यपदार्थांची चव खवय्यांना चाखता येणार आहे.

तसच या महोत्सवात कोल्हापुरी संस्कृतीचा अनुभव देणारी एक बाजारपेठ वसविण्यात येणार असून, यात कोल्हापूरी चप्पल कोल्हापूरी मिरची कोल्हापूरी गुळ

कोल्हापूरी साज

या प्रसिद्ध वस्तूही उपलब्ध असतील.

यशस्वी विद्यार्थी व मान्यवरांचा सत्कार केला जाणार आहे

याशिवाय तिन्ही दिवस मनोरंजनाचे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

रविवार दि. १० रोजी कोल्हापुरी लावणीचा आनंद घेता येईलङ.

या कार्यक्रमाचे मा. चंद्रकांत पाटील (मंत्री) हे प्रमुख पाहुणे असतील.

या कार्यक्रमात कोल्हापूरचे सर्व आमदार हजर राहणार आहेत

अनेक सिने व नाट्य कलाकार या कार्यक्रमासाठी हजेरी लावणार आहेत

लय भारी कोल्हापूरी

पुरे पुर कोल्हापूर

आपण या कार्यक्रमात सामील होताय ना?

आम्ही आपली आतुरतेने वाट पाहतोय

ठिकाण - बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईन्दर (पुर्व)

# एकत्र निवडणुकीस भाजपचा विरोध

**मुंबई-** लोकसभा व विधानसभेच्या एकत्रित निवडणुका घेण्याबाबत सेना-भाजपमध्ये एकमत झाले तर राज्य सरकारला विधानसभा विसर्जित करावी लागणार आहे. महाराष्ट्र विधानसभेची मुदत ९ नोव्हेंबरला संपते. त्याआधी सहा महिने म्हणजे ९ मेनंतर केव्हाही विधानसभा निवडणुका घेण्याचा केंद्रीय निवडणूक आयोगाला अधिकार असला, तरी सत्ताबदल झाल्यास काळजीवाहू सरकार चार-पाच महिने धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नसल्याने विधानसभेची मुदत संपण्याच्या एक-दीड महिना आधीच निवडणूक घेतली जाते, असे आयोगातील सूत्रांनी सांगितले. मात्र, एकत्रित निवडणुकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विरोध असून त्या नियोजित वेळीच व्हाव्यात, ही भूमिका आहे, तर शिवसेनेसह विरोधी पक्षांची एकत्रित निवडणुकांना सामोरे जाण्याची तयारी आहे. महाराष्ट्र व हरयाणा विधानसभेची मुदत नोव्हेंबरमध्ये संपत असून लोकसभेबरोबरच काही राज्यांच्या विधानसभा निवडणुका घेण्यास भाजप अनुकूल आहे. एकत्रित निवडणूक झाल्यास पैसे, वेळ, मनुष्यबळ यात बचत होणार असून आचारसंहिता कालावधीही एकाच वेळी राहिल्याने प्रशासनावरही परिणाम होणार नाही. त्यासाठीच 'एक देश एक निवडणूक' ही संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडली असून २०२४ पासून निवडणुका एकत्र घेण्याचे भाजपचे प्रयत्न आहेत. लोकसभा निवडणुका एप्रिल-मे मध्ये होत असून आंध्र प्रदेश, ओरिसा, सिक्कीम या विधानसभांची मुदत मे-जूनमध्ये संपत असल्याने तेथील निवडणुका लोकसभेबरोबरच होतील. महाराष्ट्राचा विचार करता विधानसभेची मुदत संपण्याआधी सहा महिने म्हणजे ९ मे नंतर कधीही किंवा लोकसभेबरोबरही विधानसभेची निवडणूक घेण्याचा निवडणूक आयोगाचा घटनादत्त अधिकार आहे. त्यासाठी विधानसभा विसर्जित करण्याचीही गरज नाही, अशी माहिती आयोगातील सूत्रांनी दिली.



# फेरीवाल्यांकडे प्लॅस्टिक पिशवी आढळल्यास परवाना तत्काल रद्द

**मुंबई-** राज्यात प्लॅस्टिक बंदी असतानाही फेरीवाल्यांकडून प्लॅस्टिक पिशव्यांचा सर्रास वापर सुरू असल्याचे दिसत आहे. आता मुंबई महानगरपालिकेने प्लॅस्टिकविरोधात जोरदार कारवाई करण्याचा निर्णय घेतला असून १ फेब्रुवारीपासून याची कठोर अंमलबजावणी करण्यात आली आहे. यासाठी पालिकेकडून विशेष पथक नेमण्यात आलं आहे. हे पथक प्रत्येक फेरीवाल्याची झाडाझडती घेतली जाणार असून प्लॅस्टिक पिशवी आढळल्यास तत्काळ परवाना रद्द केला जाणार आहे. सरकारने २३ जूनपासून राज्यात प्लॅस्टिकबंदी लागू केली आहे. असे असतानाही अनेक फेरीवाल्यांकडून प्लॅस्टिक पिशव्यांचा सर्रास वापर सुरू असल्याचे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर पालिकेने फेरीवाल्याकडे प्लॅस्टिक पिशवी आढळल्यास त्याला 'ब्लॅक लिस्ट' करून 'फेरीवाला परवाना प्रक्रियेतून' बाद करण्याचा निर्णय याआधीच घेतला आहे. या निर्णयाची १ फेब्रुवारीपासून कठोर अंमलबजावणी करण्यात आली आहे. पालिकेच्या २४ वॉर्डांमध्ये कारवाई केली जाणार आहे. यासाठी पालिकेकडून विशेष पथक नेमण्यात आलं आहे. २३ जूनपासून पालिकेने केलेल्या कारवाईत आतापर्यंत तब्बल ३५ हजार किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आल्याची माहिती आहे.

पृष्ठ १ वरुन

# Budget 2019: निवडणुकीच्या तोंडावर लोकप्रिय घोषणांचा पाऊस

योजनेबरोबर आम्ही प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन पेन्शन योजना जाहीर करत आहोत. त्यात ६० वर्षे वयानंतर दर महिना ३ हजार रूपये पेन्शन मिळेल. सरकार श्रमिकांच्या पेंशन अकाउंटमध्ये बरोबरीचे योगदान देईल. असंघटित क्षेत्रातील लोकांना या योजनेचा फायदा मिळेल. या स्किमसाठी सरकार ५०० कोटी रूपये देईल.

**शेतकरी**

कष्टाळू शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य भाव मिळत नाही. आमच्या सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी इतिहास प्रथमच २२ पिकांसाठी हमीभाव दीडपट केला आहे. शेतकऱ्यांनी गेल्या साडे चार वर्षात रेकॉर्डब्रेक उत्पादन घेतले आहे. शेतकऱ्यांना योग्य उत्पन्न सहाय्य मिळण्याची आवश्यकता आहे. छोट्या आणि किरकोळ शेतकऱ्यांचे उत्पन्न सुनिश्चित करण्यासाठी ऐतिहासिक अशी पंतप्रधान किसान सन्मान निधीची योजना मंजूर केली आहे. दोन हेक्टर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना सहाय्य देण्यासाठी दरवर्षी ६ हजार रूपये देण्याचा निणऱ्य घेतला आहे. ही मदत २-२ हजारांच्या तीन टप्प्यांत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. या योजनेचा संपूर्ण खर्च सरकार उचलणार आहे. या योजनेचा १२ कोटी शेतकऱ्यांना थेट लाभ मिळेल. १ डिसेंबर २०१८ पासून लागू झाली आहे. लवकरच शेतकऱ्यांची यादी तयार करून त्यांच्या खात्यात दोन हजारांचा पहिला टप्पा जमा करण्यात येईल. यासाठी ७५ हजार कोटी रूपयांचा खर्च येणार असून तो खर्च सरकार उचलणार आहे.

**आरोग्य**

देशात २१ एम्स रूग्णालये विकसित करण्यात येत आहे. १४ एम्सचे काम सुरु झाले आहे. २२ वे एम्स हरियाणामध्ये सुरु होत असल्याचे सांगताना आज आनंद होत आहे. रोजच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण कराव्यात की, बचत करावी याबाबतीत व्यक्ती धर्मसंकटात होता. देशातील ५० कोटी लोकांना हेल्थ कव्हर मिळावे यासाठी आम्ही 'आयुष्मान भारत' ही जगातील सर्वात मोठी हेल्थकेयर योजना लागू केली.

**ग्रामीण-गरीब..**

आम्ही जवळपास प्रत्येत घरात मोफत वीज जोडणी दिली आहे. मार्ज २०१९ पर्यंत जवळपास सर्व घरांत वीज पोहोचलेली असेल. आम्ही मिशन मोडमध्ये खासगी क्षेत्राचे विलिनिकरण करत १४३ एलईडी कोटी बल्ब उपलब्ध केले आहेत. यामुळे दरवर्षी ५० हजार कोटी रूपयांच्या वीजेची बचत होईल. आम्ही पंतप्रधान घरकुल योजनेंतर्गत पाच वर्षांत १.५३ कोटी घर उभारली आहेत. ही संख्या पहिल्यापेक्षा पाच पटीने जास्त आहे. २०१४ पर्यत अडीच कोटी परिवार वीजेपासून दूर होते. गरीब आणि मध्यम वर्गासाठी स्वस्त दरात धान्य उपलब्ध करण्यासाठी २०१८-१९ मध्ये एक लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे. यासाठी २०१३-१४ मध्ये फक्त ९२ कोटी रूपये खर्च करण्यात आले होते. तसेच मनरेगासाठी ६० हजार कोटी रूपयांचे वाटप करण्यात आले. आहे. देशाच्या साधन संपत्तीवर पहिला हक्क गरीबांचा आहे. सरकारने एसटी-एसटी आणि ओबीसी प्रवर्गाच्या कोट्याला धक्का न लावता गरीबांसाठी सरकारी नोकरी आणि शिक्षणामध्ये १० टक्के आरक्षण देण्याचे ठरवले आहे. या संस्थांमध्ये दोन लाख जागा उपलब्ध करण्यात येतील यामुळे कोणत्याही प्रवर्गाला आरक्षित जागांमध्ये कमतरता भासणार नाही. आम्ही २०१९ मध्ये स्वच्छ भारत मिशन राबवणार आहेत. आतापर्यंत ५.४५ लाख गावांना उघड्यावर शौच करण्यापासून मुक्त केले आहे. आम्हाला लोकांची मानसिकता बदलण्यात यश आले आहे.

## संपादकीय...

# अखेर झाला समतावादी युगाचा शेवट




संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

*(पृष्ठ १ वरुन)* त्याचे स्वागत केले असते का? मोबाइलची रेंज गेली किंवा वायफाय बंद पडले, तर कासावीस होणाऱ्या, रेल्वे किंवा मेट्रो ठप्प झाली तर स्ट्रेस येणा-या, ट्रॅफिक जॅममध्ये अडकल्यावर फ्रस्ट्रेट होणा-या आजच्या तरुण पिढीला 'बंदसम्राट' हे बिरूद मिरवणा-या जॉर्ज यांचे काही कौतुक वाटेल का? कदाचित, सोशल मीडियावर जॉर्ज यांच्या निंदानालस्तीच्या हजारो पोस्ट ही तरुणाई टाकून मोकळी होईल किंवा ट्विटरवर जॉर्ज यांना ट्रोल करायलाही तिने मागेपुढे पाहिले नसते. महापालिकेचा सफाई कामगार, हॉटेलातील कामगार याला किमान वेतन, हक्क मिळावा, याकरिता हयात खर्ची घातलेल्या व या कामगाराला सन्मानाने जगण्याकरिता लढणा-या जॉर्ज यांना आज वेगवेगळ्या कामगार कायद्यांच्या गळ्याला सरकार, उद्योगपती, बँकर्स आदींनी नख लावलेले असताना तसाच संघर्ष करणे शक्य होते का? बँकेतील नोकरी म्हणजे सुस्थापित जीवन, असे समजण्याचा तो काळ होता. मात्र, आता बँकेत कागदावर साडेसहा ते सात तासांची ड्युटी राहिली आहे. बँकेतील कर्मचा-यांना आठ ते दहा तासांची ड्युटी करावीच लागते. कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळत नाही. बोनस, ओव्हरटाइम वगैरे शब्द तर इतिहासजमा झाले आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रांतील तंत्रज्ञानाने प्रॉडक्शन, सर्व्हिस, मार्केटिंग वगैरे क्षेत्रे व्यापली असून कमीत कमी मनुष्यबळात काम करून घेण्यामुळे १३० कोटींच्या या देशापुढे आव्हान उभे राहिले आहे. चालकाविना चालणारी मोटार किंवा रेल्वे ही कल्पना पुढील पाच वर्षांत प्रत्यक्षात आलेली दिसणार असेल, तर देशापुढे बेरोजगारीचे किती गहिरे संकट उभे राहिले आहे, याची कल्पना येऊ शकते. डिजिटल इंडिया या केंद्र सरकारच्या योजनेत मनुष्यविरहित बँक ही संकल्पना अमलात आली आहे. रोख भरण्याकरिता, रोख काढण्याकरिता आणि पासबुकात एण्ट्री करण्याकरिता यंत्रे बसवल्यावर एखादा सुरक्षारक्षक तैनात करून बँक चालवली जाऊ शकते. गावागावांत एक लॅपटॉप घेऊन फिरणारे तीन लाख बँकमित्र सरकारने तयार केले आहेत. तो बँकमित्र हीच चालती फिरती बँक असल्याने बँकेची शाखा ही संकल्पनाही संपुष्टात येणार आहे. एकीकडे तंत्रज्ञानाने बँक व्यवहार एका क्लिकवर केले असल्याने बसल्या जागी बसून व्यवहार करणे शक्य असले, तरी ऑनलाइन व्यवहारांतील घोटाळे, फसवणूक हे प्रकार वाढले आहेत. तंत्रज्ञान वाईट नाही. उलटपक्षी, तंत्रज्ञानाचा वापर केलाच पाहिजे. मात्र, खासगी हातात तंत्रज्ञान गेल्यावर नफा हाच मुख्य हेतू ठरतो आणि मनुष्यबळ हे ज्या देशाचे व्यवच्छेदक लक्षण आहे, त्या देशात कोणकोणत्या समस्या निर्माण होऊ शकतात, याचे भान सरकारने राखले पाहिजे. गेल्या काही वर्षांत सेवा क्षेत्राने चांगले बाळसे धरले आहे. मात्र, या क्षेत्रात १२ तासांची ड्युटी केल्यावर जेमतेम आठ ते दहा हजार रुपये वेतन दिले जाते. काही ठिकाणी स्वाक्षरी एका विशिष्ट रकमेच्या कागदावर करून घेतली जाते व प्रत्यक्षात हातात त्यापेक्षा कमी रक्कम टेकवली जाते. कॉल सेंटर व तत्सम नोक-यांमध्ये पदवीप्राप्त तरुण-तरुणींना १५ ते २० हजार रुपये वेतन दिले जाते. मात्र, चार ते पाच वर्षे नोकरी केल्यावर जेव्हा वेतन समाधानकारक पातळी गाठते, तेव्हा अचानक अकार्यक्षमतेचा शिक्का मारून कामावरून काढून टाकले जाते. सलग दोन ते तीन वर्षे ॲचिव्हर्स अवॉर्ड प्राप्त केलेल्या तरुणतरुणीला कामावरून तडकाफडकी काढून टाकण्याचा हेतू हाच असतो की, त्याच्या वाढलेल्या वेतनात दोन किंवा तीन फ्रेशर्स कामावर ठेवता येतात. कॉल सेंटर किंवा विविध कंपन्यांच्या बॅक ऑफिसमध्ये काम करणारे हे सर्व कर्मचारी असले तरी नोकरीवर रुजू होण्यापासून त्यांना एक्झिक्युटिव्ह व तत्सम पदे देऊन त्यांच्या मनावर तुम्ही कर्मचारी नव्हे, तर व्यवस्थापनाचे प्रतिनिधी असल्याचे ठसवले जाते. त्यामुळे तडकाफडकी काढून टाकले जाते, तेव्हा आपण औद्योगिक विवाद कायद्याखाली दाद मागू शकतो, याचेही भान या तरुणतरुणींना नसते. आपला मुलगा किंवा मुलगी आयटी क्षेत्रात गेला म्हणजे पालकांना हात स्वर्गाला लागल्याचा आनंद होतो. मात्र, या क्षेत्रातील नोकरी स्वीकारताना कंत्राटातच कुठल्याही युनियनचे सदस्य होणार नाही, हे लिहून द्यावे लागते. आयटी कंपन्यांत नैसर्गिक विधीला गेल्यावर किती कालावधीत परत जागेवर येऊन बसले पाहिजे, याचे नियम आहेत. शेजारी बसणाऱ्या व्यक्तीशी बोलण्याची मुभा नाही. विदेशातील कंपन्यांसोबत काम असल्याने त्यांच्या कामाच्या वेळेनुसार रात्रीअपरात्री काम करावे लागते. अन्य क्षेत्रांत अनुभव ही शिदोरी असली तरी आयटी क्षेत्रात एखाद्याचे ज्ञान हे कालबाह्य झाल्यावर कंपन्या त्याच व्यक्तीला अपडेट होण्याकरिता प्रशिक्षण देत नाहीत. अशा कालबाह्य व्यक्तीला नारळ दिला जातो. त्या व्यक्तीला अन्यत्रही नोकरी मिळत नाही. आयटी क्षेत्रातील व्यक्ती बँकिंग किंवा प्रॉडक्शन अशा कुठल्याच क्षेत्रात नोकरी करू शकत नाही. वेगवेगळ्या क्षेत्रांतील रोजगारामधील अत्यल्प वेतन, घटत चाललेले लाभ, कंत्राटी पद्धत, अस्थिरता यामुळे क्रेडिट कार्डधारकांच्या थकबाकीचे आकडे फुगत चालले आहेत. आयटीसारख्या क्षेत्रात भक्कम पगाराची नोकरी असताना खरेदी केलेल्या टू बीएचके किंवा थ्री बीएचकेचे हप्ते नोकरी गमावल्यावर न भरल्यामुळे थकबाकीदार झालेल्यांची प्रकरणेही झपाट्याने वाढत आहेत. नोकरीच जर कायम नसेल तर घर, संसार करण्याचे दूरगामी स्वप्न कसे व का पाहायचे, असा विचार करणारी व पगार चांगला असला तरीही आजचा क्षण सुखात घालवणारी नवी युवा पिढी तयार झाली आहे. ही पिढी आता फ्लॅट विकत घेऊन कुटुंबवत्सल जीवन जगण्यास तयार नाही. भाड्यानं फ्लॅट घेऊन लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहायचे, आज खिशात पैसा खुळखुळतोय, तर चैन करतो, असा विचार करणारी ही एक प्रवृत्ती आहे.

समजा, उद्या बख्खळ पैशांची नोकरी गेली, तर कुणाला गंडा घालून किंवा जुगाड करून मी माझी लाइफस्टाइल मेन्टेन करणार. मात्र, माझ्यामागं पाश निर्माण करणार नाही, असा विचार ते करतात. त्याचवेळी जेमतेम आठ-दहा हजार रुपये कमावण्यामुळे हातावर पोट असलेली व घर, संसाराचा विचारही करू न शकणारी, ओढग्रस्त जीवन जगणारी दुसरी प्रवृत्ती आहे. या तरुणाईच्या खिशातील मोबाइलमध्ये त्यांना जगात लोक कोणकोणती सुखं उपभोगतात, तेही दिसते आणि सनी लिऑनचे पोर्न पण पाहता येतात. हे पाहून माथी भडकलेले याच वर्गातील तरुण मग शरीरसुखापासून काहीही ओरबाडण्याची वृत्ती ठेवतात. निर्भया प्रकरणानंतर कडक कायदा करूनही बलात्कार, विनयभंगांची प्रकरणे कमी होण्याऐवजी वाढण्याचे एक कारण जीवनातील ही अस्थिरता हेही आहे. तुरुंगात गेलो काय आणि बाहेर राहिलो काय, काय फरक पडतो? असा त्यांचा -हस्व दृष्टिकोन परिस्थितीने तयार केला आहे. त्यामुळे जॉर्ज फर्नांडिस आज सक्रिय असते, तर कदाचित हेटाळणीचा विषय झाले असते आणि अस्थिरतेच्या गर्तेतील कामगार, कर्मचारी त्यांना पाहवला नसता. त्यामुळे बंदसम्राटाने योग्य वेळी डोळे बंद केले, हेच उत्तम झाले.

# Budget 2019

# तूच घडविसी, तूच फोडिसी..



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचे आधीचे अर्थसंकल्प म्हणजे सरकार जनतेसाठी काय देऊ इच्छिते, याची उदाहरणे होती. शुक्रवारी सादर झालेले लेखानुदान म्हणजे जनतेला सरकारकडून काय हवे आहे, त्याची पूर्तता होती. लेखानुदान नावालाच उरले होते कारण जवळपास संपूर्ण अर्थसंकल्पच लेखानुदानाच्या नावाखाली सादर करण्यात आला. आश्वासनांची खैरात करण्यात आली आणि अर्थमंत्री अरुण जेटली यांनी लिहिलेले व हंगामी अर्थमंत्री पियूष गोयल यांनी अत्यंत नाट्यपूर्ण पद्धतीने वाचलेले अर्थसंकल्पीय भाषण संपले आणि लोकसभा निवडणूक जाहीर होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली, हे प्रकर्षाने जाणवले. अर्थसंकल्प म्हटले की त्यात दोन भाग येतात. एक म्हणजे कररूपाने सरकार किती व कसा पैसा गोळा करणार आहे हा एक आणि त्या पैशाचा विनियोग करतानाच विविध क्षेत्रांसाठी कोणत्या करसवलती लागू करणार हे सांगताना एकूण अर्थव्यवस्थेचा आणि मागील एका वर्षाचा आढावा घेतला जातो. लोकसभा निवडणूक जवळ आल्याने गोयल यांनी एकदम साडेचार वर्षांचा आढावा घेऊन टाकला आणि आपला पक्ष निवडणुकांना तयार आहे हे सगळ्यांना दाखवून दिले. दर अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी आर्थिक पाहणी अहवाल मांडण्याची प्रथा आहे. या वर्षी लेखानुदान आहे, अर्थसंकल्प नाही असे कारण देऊनच बहुधा सरकारने हा आर्थिक पाहणी अहवाल मांडलाच नाही. त्याऐवजी वाढत्या बेरोजगारीचे आकडे मात्र जाहीर झाले आणि त्या वादातून बाहेर पडताना संबंधितांची चांगलीच दमछाक झाली. या अर्थसंकल्पाला आर्थिक पाहणी अहवालाची पार्श्वभूमी असती तर अर्थव्यवस्थेबाबतचा एक संपूर्ण दृष्टिकोन नजरेसमोर आला असता. मात्र तसे झाले नाही. म्हणूनच अर्थसंकल्प मांडताना सर्वांसाठी जी खैरात करण्यात आली आहे, त्यासाठी पैसा कुठून येणार, याचा पत्ता लागला नाही.

### शेतकऱ्यांना आधार

अर्थसंकल्प मांडताना मोदी सरकारने प्रामुख्याने शेतकरी, मध्यमवर्गीय, कामगार वर्ग यांना डोळ्यासमोर ठेवलेले दिसते. ज्या शेतकऱ्यांकडे दोन हेक्टर म्हणजेच पाच एकारपर्यंत जमीन आहे, त्यांना दरमहा पाचशे रुपये देण्यात येणार आहेत. वर्षाचे सहा हजार रुपये दोन दोन हजारांच्या तीन हप्त्यांत देण्यात येणार आहेत. ही योजना एक डिसेंबर २०१८ पासून राबविण्यात येणार आहे. याचा अर्थ असा की निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात पहिला हप्ता जमा झालेला असेल. निवडणुकीच्या निमित्ताने का असेना, या शेतकऱ्यांचे भले झाले ही बाब महत्त्वाची आहे. दरमहा पाचशे रुपये ही रक्कम खूपच कमी आहे हे मान्य, परंतु एकदा योजना नीट कार्यान्वित झाली की ती रक्कम नंतर वाढविताही येईल. आताच्या वार्षिक सहा हजार रुपये या रकमेनेच सुमारे ७० हजार कोटी रुपये खर्च होतील. ही रक्कम छोटी नाही. नैसर्गिक आपत्तीत सापडल्याने पीक गमावणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या कर्जाच्या व्याजात दोन टक्के सवलतही मिळणार आहे. वेळेवर कर्जफेड करणाऱ्यांना आणखी तीन टक्के व्याजसवलत मिळेल. हे चांगले झाले. संपूर्ण कर्जमाफी केली असती तर सरकारला लोकप्रियता मिळाली असती, परंतु अर्थव्यवस्था कोसळली असती.

### मध्यमवर्गावर मेहेरनजर

या अर्थसंकल्पाकडे मध्यमवर्गाचेही लक्ष लागले होते. भारतीय जनता पक्षाला २०१४ मध्ये निवडून आणण्यात प्रामुख्याने हा मध्यमवर्ग व उच्च मध्यमवर्ग जबाबदार होता. शिवाय 'अच्छे दिनां'चे स्वप्न पडलेला आर्थिक कमकुवत गटातला कामगारही होता. यातील नोकरदार वर्गाला अडीच लाखाऐवजी थेट पाच लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न संपूर्ण कारमाफ करण्याचा निर्णय तीन कोटी करदात्यांना फायदेशीर ठरेल. हे पाच लाख रुपये आणि दीड लाखाची गुंतवणूक केल्यास एकूण साडेसहा लाख रुपये आणि स्टँडर्ड वजावट म्हणून ५० हजार रुपये असे एकूण सात लाख रुपये करमुक्त असतील. सात लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या लोकांना मात्र आधीच्या म्हणजे २० आणि ३० टक्के स्लॅबमध्ये कर भरावा लागेल. ती मंडळी हिरमुसली असली तरी पाच लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या लोकांची संख्या बरीच मोठी असल्याने त्यांच्यासाठी हा एक आनंददायी निर्णय ठरेल. मध्यमवर्गाला करसवलत देण्याचा निर्णय हंगामी अर्थमंत्र्यानी अगदी शेवटी जाहीर केला. अर्थसंकल्पाचे भाषण संपत आल्याने, मध्यमवर्गीयांची मोठी निराशा होणार असे चित्र दिसत होते. पण गोयल यांनी शेवटच्या चेंडूवर षट्कार मारला आणि जणू सामना जिंकला. दुसरे घर विकत घेणाऱ्यांना जो जीएसटी भरावा लागतो, त्याचा अभ्यास करण्यासाठी मंत्र्यांची समिती नेमण्यात आली आहे आणि ती यावर निर्णय घेईल. निवडणुकीच्या आधी बहुधा हाही दिलासा मिळेल, असे वाटते. गृहनिर्माण क्षेत्राबाबत निर्णय घेताना सरकारने ग्राहक व बांधकाम व्यावसायिक अशा दोघांनाही खूष केले आहे. दुसरे घर असल्यास व ते रिकामे असल्यास म्हणजे भाड्याने न दिल्यासही त्यातून भाडे येत आहे असे समजून त्यावर ग्राहकाला कर भरायला लागे. तो आता भरावा लागणार नाही. बांधकाम व्यावसायिकाने विकल्या न गेलेल्या घरांवर एक वर्षानंतर भाड्यावर (ती जागा भाड्याने दिल्यास जे भाडे येऊ शकते अशा) कर भरणे अपेक्षित होते. ती मुदत आता दोन वर्षांची झाली आहे. म्हणजेच दोन वर्षे एखादे घर विकले गेले नाही तरी बांधकाम व्यावसायिकाला काहीही कर भरावा लागणार नाही. गेल्या काही काळात बांधकाम व्यवसायात आलेली मंदी पाहता ही सवलत मोठीच म्हणायला हवी. या व अन्य सवलतींमुळे हा व्यवसाय पुन्हा भरभराटीला आला तर अर्थव्यवस्थेचा फायदाच होणार आहे.

### पैसा कसा आणणार?

असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना जाहीर झाली, हेही महत्त्वाचे पाऊल आहे. कारण औद्योगिकरणात हा वर्ग जास्त भरडला जातो. त्यांना निश्चित उत्पन्नाची काही हमी नसल्याने जगणेही अनिश्चित बनते. असंघटित क्षेत्रातीलच लोकांनी दरमहा १०० रुपये भरल्यास त्यांच्या वयाच्या साठीनंतर दरमहा तीन हजार रुपयांचे निवृत्तिवेतन मिळेल. याचा सुमारे दहा कोटी लोकांना फायदा मिळेल. ही योजना जगातील अशा प्रकारची सर्वांत मोठी योजना ठरेल, अशी अपेक्षा अर्थमंत्र्यानी व्यक्त केली. तसे झाले तर भारताने जगाला घालून दिलेला उत्तम आदर्श ठरेल, असे म्हणायला हरकत नाही. अर्थसंकल्प सादर होताना प्रत्येक घोषणेनंतर भारतीय जनता पक्ष व त्यांच्या सहकारी पक्षांनी उघड जल्लोष केला तर काँग्रेस व त्यांच्या सहकारी पक्षांच्या सदस्यांचे चेहेरे अत्यंत निर्विकार होते. विशेषतः राहुल गांधी यांच्या चेहऱ्यावर काहीच भावना दिसत नव्हती. याउलट, पंतप्रधान स्वतः अनेक वेळा बाकावर वाजवून आनंद व्यक्त करीत होते. गोयल यांनी गेल्या साडेचार वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला तेव्हाही हीच प्रतिक्रिया होती. जणू हा अर्थसंकल्प आपल्याला नि:संशय पुन्हा निवडून आणणार आहे, असेच भाव सगळ्या भाजप खासदारांच्या चेहऱ्यावर दिसत होते. प्रत्यक्षात निवडणुकीत काय होईल हा भाग वेगळा, परंतु मोदी सरकार पुन्हा निवडून आले तर आपण दिलेल्या भरमसाट सवलतींसाठी पैसा कुठून आणायचा, याचाही विचार त्यांनाच करायला लागणार आहे.

### तारेवरची कसरत

अर्थसंकल्पात सरकारने नऊ क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणार असल्याचे सांगितले. डिजिटल भारत, स्वच्छ भारत, ग्रामीण भारतात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणून औद्योगीकीकरण, नद्या स्वच्छ करणे व सर्व भारतीयांना पिण्यायोग्य स्वच्छ पाणी देणे, धान्योत्पादनात स्वयंपूर्ण बनणे, भारताला आरोग्यसंपन्न करणे आणि जनतेशी नीट वागेल अशी नोकरशाही तयार करून वेगवान कारभार करणे ही त्यातील काही क्षेत्रे आहेत. हे मुद्दे लेखानुदानात मांडण्याचे काय कारण ते कळले नाही.

# निग्रोच्या ३ अनधिकृत बारवर गुन्हे शाखेची धाड

**नालासोपारा :** येथील पूर्वेकडील प्रगती नगर परिसरातील दोन इमारतीमधील ३ फ्लॅटमध्ये निग्रोंनी अनिधकृतपणे थाटलेल्या बारवर गुन्हे शाखेने धाड मारून हजारो रुपयांच्या दारुसह ५ महिला आणि २ पुरुष निग्रोंसह एकूण ७ जणांना अटक केली आहे. याबाबत गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे.

नूर आणि जय माता दि अपार्टमेंट मधील ३ रूममध्ये काही निग्रोनी अनिधकृतपणे बार थाटल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना खबऱ्याने बुधवारी दिली होती. यानंतर पालघर जिल्ह्यातील बोईसर आणि वसई येथील गुन्हे शाखेच्या टीमने धाड टाकण्यासाठी सापळा रचला. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक प्रताप दराडे आणि आरसीपी प्लॅटूनसह बुधवारी छापा टाकला असता नूर अपार्टमेंट मधील रूम नंबर १०१ आणि २०१ मध्ये आलिशान अनधिकृत बार थाटला होता.

# सुप्त मनाची ताकद

सोलोमन बेटावर आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. ते आदिवासी लोक प्रथेनुसार झाडे तोडणे अपशकुनी समजतात.

एखादे झाड तोडायचे असेल तर एकत्र येऊन दररोज झाडाभोवती वर्तुळाकार तास न तास बसून झाडाला नकारात्मक लहरींनी (negative destructive frequency) घायाळ करतात. आश्चर्याचा भाग म्हणजे काही आठवड्यात ते झाड शुष्क होऊन उन्मळून पडते.

हे उदाहरण कोणालाही पचनी पडणे अवघड आहे.

ते अविश्वसनीय वाटणे स्वाभाविक आहे. अदृश्य, न दिसणारे, नकारात्मक मन, चिन्तन करणारे विचार, एका झाडाचे अस्तित्व नष्ट करू शकतात का?

तुम्हाला जर ब्रुस लिप्टनचे पुस्तक ऊप Biology of Belief वाचण्याची संधी मिळाली तर तुम्ही सोलोमन बेटावरील गोष्टच नव्हे तर तुम्ही तुमच्याबद्दल आणि ज्याच्यावर प्रेम करतात त्याच्या विषयी नकारात्मक बोलण्यावेळी हजार वेळेस विचार कराल.

लिप्टन यांनी या पुस्तकात जागृत (conscious) आणि सुप्त मनाच्या (subconscious min) ताकदीवर विस्तृत विवेचन केले आहे.

सुप्त मनाची ताकद ही जागृत मनाच्या ताकदीपेक्षा दशलक्ष पटीने जास्त असते.

दैनंदिन जीवनात सुप्त मनाचा नकळत प्रचंड प्रभाव असतो.

पुष्कळ वेळा आपण आपल्या वाईट सवयी अथक प्रयत्न आणि इच्छाशक्ति असताना सुद्धा सोडू शकत नाही. त्याचे मुख्य कारण ह्या वाईट सवयी सुप्त मनामध्ये प्रभावीपणे प्रोग्राम केल्या जातात आणि ते आपले सर्व प्रयत्न निष्क्रिय करतात.

जागृत मन (Conscious mind) ही सुप्त मनाची (Subconscious) केवळ सावली असते.

सोलोमन बेटावरील आदिवासी हे प्रभावीपणे नकारात्मक लहरींनी झाडाच्या संवेदनेवर (emotion) आघात करतात. झाडांना संवेदना असतात हे ही तितकेच खरे आहे.

काही दिवसांनी त्या आघाताने त्या संवेदना झाडाच्या एक अंगीभूत भाग होऊन जातात आणि त्यामुळे झाडाची अणुरचना ढासळते. झाड आतूनच मरणासन्न होते.

त्या पुस्तकात जागृत पालकत्वावर स्वतंत्र प्रकरण आहे.

त्यात मुलावर सतत नकारात्मक बोलण्यामुळे, त्याच्या जडणघडणीवर विपरीत परिणाम होतात.

याउलट सकारात्मक विचार, मुलाचे जीवनात उपयुक्त पडतात.

तेच तेच सारखं बोलत राहणे सुप्त मनावर पगडा करते आणि तसेच घडत जाते याची प्रचिती दिसून येतेच.

म्हणूनच रोज असे म्हणा..

'मी सुखी आहे,

मी सर्व गुणसंपन्न आहे,

माझ्याकडे भरपूर पैसा, उत्तम आरोग्य, उत्तम नाती, उच्चकोटीचा समाज, असे सर्वांगीण सुख समृद्धीने परिपुर्ण जीवन मी जगत आहे.

जे होत आहे आणि होणार आहे ते सर्व चांगलेच होणार आहे!'

नेहमी असेच विचार मनात सतत असू द्या.

हाच आपल्या सगळ्यांसाठी समृद्ध जीवनाचा कानमंत्र आहे !

*LAW OF ATTRACTION*

नुसार ङआपण जे पॉझिटिव्ह किंवा negative विचार करतो.. त्या त्या गोष्टी आपण विचार मार्फत आपल्याकडे आकर्षित करत असतो.

# भेसळयुक्त ४०० किलो पनीरसह तिघांना अटक

**वसई -** मुंबई अहमदाबाद महामार्गावरील चिंचोटी कामण रोड येथील एका तब्येल्यावर पालघर पोलीस अधीक्षकांच्या विशेष टीमने छापा घालून ४०० किलो भेसळयुक्त पनीरसह तिघांना अटक केली. अन्न व औषध विभागाच्या अधिकाऱ्यांना तपासणीसाठी पनीरचे नमुने आणि तिन्ही आरोपीना ताब्यात देत भेसळयुक्त पनीरसह इतर साहित्य नष्ट करण्यात आले.



वसई तालुक्यात विविध ढाबे, हॉटेल्स, रिसॉर्ट या ठिकाणी विविध कंपनीचे आरोग्यास घातक असलेले भेसळयुक्त पनीर, बटर मोठ्या प्रमाणात बनविले जात असल्याच्या तक्र ारी पालघर पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांना मिळालेल्या होत्या. गुरु वारी गुप्त महितीच्या आधारे विशेष टीमचे पोलीस उपनिरीक्षक मल्हार थोरात, सहायक पोलिस उपनिरीक्षक सुरेंद्र शिवदे यांना कारवाईचे आदेश देण्यात आले. गुरु वारी रात्रीच्या सुमारास हे पथक कामण चिंचोटी रोडवरील आश्रम शाळेच्या मागील बाजूला असलेल्या शुक्ला तबेला याठिकाणी पोहचले. तबेल्यात मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त पनीर बनवताना पोलिसांनी अभिनव शुक्ला यांच्यासह दोन कामगारांना रंगेहाथ पकडले. ४०० किलो भेसळयुक्त पनीर, १० किलो ग्लिसरॉल पावडर, ५ ते ६ लिटर ॲसिटिक ॲसिड, बनावट दूध पावडर व इतर साहित्य सापडले. पोलिसांनी अन्न व ओषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना फोन करून घटनास्थळी बोलावले. अधिकारी आल्यानंतर पकडलेले तिन्ही आरोपी आणि पुढील तपासणी करण्याकरिता भेसळयुक्त पनीरचे नमुने पोलिसांनी दिले. १ लाख ६० हजार रु पये किंमतीचे भेसळयुक्त पनीर नष्ट करण्यात आले आहे.

# वसई-विरार महापालिकेची तोडक कारवाई

**नालासोपारा :** वसई विरार महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या प्रभागात पालिकेचे उपायुक्त डॉ. किशोर गवस यांच्या आदेशानुसार गेल्या दोन दिवसापासून अनधिकृत बांधकामावर जोरदार कारवाईची सुरू आहे. पालिका प्रशासनाने औद्योगिक गाळे, बॅनर, पोस्टर आणि अनिधकृत इमारतीवर पोकलेंनच्या सहायाने कारवाई केली आहे.



प्रभाग 'ब'चे सहायक आयुक्त विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुरु वारी पूर्वेकडील प्रगती नगर परिसरातील सहा हजार चौरस फूट लांबीचे अनधिकृत मार्केट तोडण्यात आले आहे. तसेच, आजूबाजूच्या रस्त्यालगत असलेले बॅनर आणि पोस्टर्सवर कारवाई करण्यात आली आहे. त्याच दिवशी प्रभाग 'एफ' मध्ये गावराई पाडा येथील आदर्श औद्योगिक विभागातील १८०० चौरस फूट आणि वधन नगरमधील २४०० व १३५० चौरस फूट लांबीचे दोन गाळे ही उध्वस्त करण्यात आले. शुक्रवारी प्रभाग 'सी'मध्ये गांधी चौकातील फुलपाडा येथील २ मजल्याची अतनधिकृत इमारत आणि ५ रूम तोडण्यात आले. तसेच बरफपाडा येथील सव्हे नंबर ४५ मधील अनधिकृतपणे बनविण्यात आलेली प्लिन्थ तोडण्यात आली. स्थानिकांनी पालिकेच्य पथकाला किरकोळ विरोध केला मात्र, पोलीस दल सोबत असल्याने तो निवळला. मात्र, ही बांधकामे सुरु असताना मनपाकडून कोणतीही कारवाई न झालल्याने आज सर्वसामान्या उघड्यावर आल्याची प्रतिक्रीय देण्यात आली.

# निग्रोच्या ३ अनधिकृत बारवर गुन्हे शाखेची धाड

**नालासोपारा :** येथील पूर्वेकडील प्रगती नगर परिसरातील दोन इमारतीमधील ३ फ्लॅटमध्ये निग्रोंनी अनिधकृतपणे थाटलेल्या बारवर गुन्हे शाखेने धाड मारून हजारो रुपयांच्या दारुसह ५ महिला आणि २ पुरुष निग्रोंसह एकूण ७ जणांना अटक केली आहे. याबाबत गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे.

नूर आणि जय माता दि अपार्टमेंट मधील ३ रूममध्ये काही निग्रोनी अनिधकृतपणे बार थाटल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना खबऱ्याने बुधवारी दिली होती. यानंतर पालघर जिल्ह्यातील बोईसर आणि वसई येथील गुन्हे शाखेच्या टीमने धाड टाकण्यासाठी सापळा रचला. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक प्रताप दराडे आणि आरसीपी प्लॅटूनसह बुधवारी छापा टाकला असता नूर अपार्टमेंट मधील रूम नंबर १०१ आणि २०१ मध्ये आलिशान अनधिकृत बार थाटला होता. त्याचप्रमाणे बाजूला असलेल्या जय माता दि अपार्टमेंच्या रूम नंबर १०१ मध्ये भल्या मोठ्या रूममध्ये अनिधकृत बार थाटल्याचे पोलिसांना आढळून आले. ३ अनिधकृत बार मधून विविध कंपनीच्या बियर, व्हिस्की, वाईन असा एकूण दारूचा ५४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# मराठा क्रांती मोर्चा पुन्हा फुंकणार रणशिंग

**औरंगाबाद- छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तारखेनुसार १९ फेब्रुवारीलाच साजरी व्हावी, यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मराठा क्रांती मोर्चा भेट घेणार आहे. तसेच मराठा आरक्षणासह अन्य आश्वासनांचे काय झाले, याचा जाब विचारण्यासाठी लवकरच राज्यात पुन्हा एकदा रणशिंग फुंकले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.**

शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासोबतच मराठा समाजाला सरकारने दिलेल्या आश्वासनांचे काय झाले, याबाबत चर्चा करण्यासाठी गुरुवारी क्रांती मोर्चातर्फे हर्सूल परिसरातील मराठा मंदिर येथे बैठक घेतली.

अनेकांनी आपापली मते नोंदविल्यानंतर महत्त्वाचे निर्णय




घेण्यात आले. शिवजनजागरण करण्यासाठी ता. १७ फेब्रुवारीला महाबाईक फेरी काढण्यात येईल. आरक्षणाचे सरकारने दिलेले आश्वासन फसवे असल्याची जोरदार टीका यावेळी करण्यात आली.

आरक्षणासाठी बलिदान दिलेले काकासाहेब शिंदे यांच्याव्यतिरिक्त १० लाखांची मदत कुणालाही मिळालेली नाही. आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे अद्यापही का मागे घेतलेले नाहीत? अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे कर्ज अद्यापही मिळत नाही, ७० टक्के शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफीचा लाभ, पिकांना हमीभाव मिळाला नाही, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

महाबाईक फेरीस टीव्ही सेंटर येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून सुरवात होईल. क्रांती चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ समारोप होईल. शिवजन्मोत्सव साजरा करताना शिवभक्तांनी ता. १९ रोजी आपल्या घरासमोर सडा, रांगोळी काढाव्यात. दिवे लावून नवीन कपडे परिधान करीत घरावर भगवा ध्वज उभारून शिवाजी महाराजांना मानवंदना द्यावी, आदर्श शिवजयंती साजरी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचना यावेळी करण्यात आल्या.

# कॅन्सर मुळापासून नष्ट करणारं औषध सापडलं, इस्त्राईलमधील कंपनीचा दावा

**मुंबई-** सध्या जगभरात कॅन्सर आजाराचा विळखा वाढत चालला असून चिंतेचा विषय ठरत आहे. कोणताही उपचार किंवा औषध कॅन्सर पूर्णपणे बरा करण्याची खात्री देत नाही. मात्र इस्त्राईलमधील एका बायोटेक कंपनीने कॅन्सर मुळापासून नष्ट करण्याचा पर्याय सापडला असून २०२० पर्यंत आपण हे औषध बाजारात आणणार असल्याचा दावा केला आहे. सध्या कॅन्सरवर वेगवेगळ्या प्रकारच्या उपचारपद्धती उपलब्ध आहेत. पण कोणताही उपचार १०० टक्के कॅन्सर बरा करण्याची हमी देत नाही. पण २००० साली स्थापन झालेल्या ॲक्सिलरेटेड इवोल्यूशन बायोटेक्नॉलॉजी लिमिटेडने कॅन्सर पूर्णपणे बरा करणारं औषध सापडल्याचा दावा केला आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत



कंपनीचे चेअरमन ॲरिडोर यांनी ही उपचारपद्धती पहिल्या दिवसापासून कॅन्सरवर प्रभाव करण्यास सुरुवात करेल अशी माहिती दिली आहे. यासोबतच औषधामुळे दुसरा कोणताही त्रास होणार नसल्याचंही ते म्हणाले आहेत. सध्या उपलब्ध असणाऱ्या उपचारांशी तुलना करता याची किंमत फार कमी आणि परवडणारी असेल असंही त्यांनी सांगितलं आहे.

कंपनीने या उपचारपद्धतीला MuTaTo म्हणजेच मल्टी टार्गेट टॉक्सिन असं नाव दिलं आहे. कंपनीचे सीईओ डॉइलान मोराद यांनी सांगितल्यानुसार, आम्ही सध्या बाजारात उपलब्ध असलेली औषधं आणि उपचारपद्धती कॅन्सरवर प्रभावी का ठरत नाही आहेत याच्या कारणांचा शोध घेतला असता आम्हाला हा पर्याय सापडला. कंपनी लवकरच या औषधांची चाचणी करणार आहे.

# मुंबई ते नाशिक, पुणे लोकलची प्रतीक्षाच

**मुंबई-** मुंबई-नाशिक आणि मुंबई-पुणे लोकल सेवा सुरू करण्याची घोषणा रेल्वे मंत्रालयाने केली होती. परंतु, कठीण चढउतार असलेल्या कसारा घाट आणि बोर घाटात मध्य रेल्वेकडील सध्याच्या



लोकल चालवणे शक्य नाही, असे रेल्वेच्या लखनौ येथील रिसर्च डिझाईन्स अँड स्टॅंडर्डस ऑर्गनायझेशन (आरडीएसओ) अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत समोर आले होते. त्यामुळे या मार्गांवरील लोकल सेवेसाठी प्रतीक्षाच करावी लागणार आहे.

मुंबई-पुणे आणि मुंबई-नाशिक असा दैनंदिन रेल्वेप्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या मार्गांवर उपनगरी सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. त्याबाबत रेल्वे मंत्रालयाने सकारात्मक भूमिका घेऊन लखनौ येथील 'आरडीएसओ'मार्फत या मार्गांची पाहणी केली होती. या मार्गांवरील घाट लक्षात घेता स्वयंचलित दरवाजे आणि अद्ययावत 'हेवी ब्रेक' यंत्रणा असलेल्या लोकल आवश्यक आहेत, अशी सूचना 'आरडीएसओ'ने केली होती. त्यानुसार मध्य रेल्वेने रेल्वे बोर्डाकडे अद्ययावत लोकलची मागणी केली. रेल्वे बोर्डाने चेन्नईतील इंटिग्रल कोच कारखान्यात अशी लोकल बांधण्याचे काम सुरू असल्याचे मध्य रेल्वेला कळवले आहे. काम पूर्ण झाल्यावर ही लोकल मध्य रेल्वेला दिली जाईल. कसारा घाट आणि बोर घाटात या लोकलची चाचणी घेतल्यावरच या दोन्ही मार्गांवरील उपनगरी सेवेचे भवितव्य ठरणार आहे.

सामान्य लोकलला १६ ब्रेक असतात, मात्र या लोकलला ३२ ब्रेक असतील. या लोकलचे दरवाजे स्वयंचलित असतील. सध्याच्या लोकलच्या तुलनेत ही लोकल घाटात सहजपणे धावू शकेल, असे रेल्वेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

# बजेटमधील सर्वात मोठी आनंदवार्ता: २१ हजार वेतन असणाऱ्यांना मिळणार बोनस

**मुंबई-** नव्या दरप्रणालीसंदर्भात एमएसओने करार न केल्यामुळे नाराज केबल ऑपरेटर ग्राहकांकडून नवे फॉर्म स्वीकारण्याची जबाबदारी घेण्यास तयार नाहीत. अशा स्थितीत काही एमएसओंनी १५० रुपयांच्या फ्री टू एअर पॅकसोबत १३० रुपयांचे दुसरे सर्वसमावेशक पॅक तयार करण्याची धडपड चालवली आहे. केबलच्या नव्या दरप्रणालीचा स्वीकार करण्यासाठी गुरुवारी अखेरचा दिवस होता. मात्र, निम्म्याहून जास्त केबल ग्राहकांनी त्यासाठीचे अर्ज भरलेले नाहीत. दुसरीकडे, काही एमएसओ व ब्रॉडकास्टर अद्यापही बुके देत असल्याने काही केबल ऑपरेटर संघटनांची त्यांच्याशी वादावादी सुरू आहे. काही कंपन्या मोठे बुकेच विकत असल्याने नेमके काय



निवडायचे, याबाबत ग्राहक संभ्रमात आहेत; तर या गोंधळात काही एमएसओंनी १३० रुपयांचे नवे पॅकेज आणण्याची तयारी केली आहे. ग्राहकांना १५४ रुपयांत १०० फ्री टू एअर चॅनेलचे एक पॅकेज घ्यावे लागेल.

त्याखेरीज मुंबईतील भाषिक पट्ट्यांनुसार त्या-त्या चॅनेलचा समावेश करून १३० रुपयांपर्यंतचे दुसरे पॅकेज एमएसओ तयार करीत आहेत, असे मनसेच्या केबल सेनेने आपल्या केबल ऑपरेटरना सांगितले आहे. ग्राहकांकडून भरून घ्यायचे अर्ज कंपन्यांनी आम्हाला दिलेलेच नाहीत. त्यांना आपले मोठमोठे बुके विकायचे आहेत, पण दूरसंचार नियामक प्राधिकरणाने केबल ऑपरेटरना बुके विकायला बंदी घातली आहे, हा अन्याय आहे.

# या महिन्यातच नाशिक कल्याण लोकल धावणार!



**कल्याण-** बहु प्रतिक्षीत नाशिक-कल्याण लोकल या महिन्याच्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यात सुरू होणार आहे. त्यामुळे विद्यार्थी व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. १० ते १३ फेब्रुवारी दरम्यान कसारा ते लोणावळा या लोकलच्या चाचण्या होतील. त्यानंतर या चाचणीचा अहवाल मध्ये रेल्वेच्या मुख्य व्यवस्थापकांकडे पाठविण्यात येईल. त्यानंतर उद्घाटनाची तारीख जाहिर करण्यात येणार आहे. सध्या नाशिक-कल्याणच्या तीन लोकल तयार ठेवल्या जातील.

# गोसंवर्धनासाठी कामधेनू योजना; ७५० कोटी खर्च करणार

**नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अंतरिम अर्थसंकल्पात मध्यवर्गीय, शेतकरी आणि असंघटीत कामगारांसाठी छप्पर फाटके घोषणा केल्या आहेत. या घोषणा करताना गोसंवर्धनामध्येही हे सरकार जरा देखील कमी पडलेले दिसून आले नाही. गोमातेच्या संवर्धनासाठी या अर्थसंकल्पात अर्थमंत्री पीयूष गोयल यांनी मोठी योजना जाहीर केली आहे. कामधेनू योजनेमार्फत गोसंवर्धनात विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

गोमातेच्या सन्मानासाठी मी आणि सरकार कधीच मागे हटणार नाही. त्यासाठी जे आवश्यक असेल ते केले जाईल, असे अर्थमंत्री गोयल यांनी सांगितले. तर राष्ट्रीय गोकूळ आयोगाची स्थापना करून कामधेनू योजनेवर ७५० कोटी रूपये खर्च केले जातील अशी घोषणा गोयल यांनी केली.

लोकसभा निवडणुकीच्या आधी अंतरिम अर्थसंकल्पात सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. पशुपालन आणि मत्स पालनासाठीच्या कर्जाच्या व्याजात २ टक्के सूट मिळणार असल्याचे गोयल यांनी सांगितले. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी अनेक मोठ्या योजनांची घोषणा केली जाण्याची शक्यताही वर्तवण्यात आली होती. अर्थमंत्री गोयल यांनी शेतकऱ्यांना निराश न करता मोठी घोषणा केली.



# पत्नीला कारमध्ये फिरायची हौस; पती बनला दुचाकी चोर, ३५ दुचाकी जप्त



**बीड-** बायकोला कारमध्ये फिरायची हौस आहे मात्र, कार घ्यायला पैसे नाहीत म्हणून नवऱ्याचे चक्क दुचाकी चोरी सुरू केली. मित्रांच्या मदतीने बीडसह पुणे, लातूर, उस्मानाबाद व इतर जिल्ह्यातही त्याने दुचाकी चोरी केली. स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने या कारनाम्याचा पर्दाफाश केला. तिघांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून तब्बल ३५ दुचाकी जप्त करण्यात आल्या.

बीड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. दिवसेंदिवस दुचाकी चोरीची प्रकरणे वाढत असल्याने स्थानिक गुन्हे शाखा व पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने दुचाकी चोरीच्या तपासावर लक्ष केंद्रित केले होते. दरम्यान, सुशांत मुंडे (रा. वडवणी) हा आपल्या साथीदारांच्या मदतीने दुचाकी चोरी करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या माहितीवरून एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले होते.

दरम्यान, अन्य एक जण पोलिसांच्या हाती लागत नव्हता. गुरुवारी गणेश मुंडे (रा. धारूर) हा केज येथे चोरीची दुचाकी विक्री करण्यासाठी येत असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलिसांनी तंत्र निकेतन महाविद्यालय परिसरात सापळा रचून गणेशला ताब्यात घेतले. त्याने सुशांत सोबत दुचाकी चोरीची कबुली दिली आहे.

दरम्यान, सुशांत याचा प्रेमविवाह झाला असून तो पुण्यात राहतो. बायकोला कारमधून फिरण्याची हौस आहे मात्र कार घेण्यासाठी पैशांची गरज असल्याने तो दुचाकी चोरी करत असल्याचे त्याने पोलिस चौकशीत सांगितले. दुचाकी चोरीचे त्याचे कारण ऐकून पोलिसही अवाक झाले. पोलिस अधीक्षक जी. श्रीधर, अपर अधीक्षक वैभव कलुबर्मे, अजित बोऱ्हाडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक घनश्याम पाळवदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक अमोल धस, विशेष पथकाचे उपनिरीक्षक रामकृष्ण सागडे यांच्यासह सखाराम पवार, नसीर शेख, संतोष कातखडे, राजू वंजारे, गणेश नवले, दुधाने, वरपे, जयराम उबे यांनी कारवाई केली.

# सातव्या वेतन आयोगासाठी आणखी महिनाभर प्रतीक्षा

**मुंबई-** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सातव्या आयोगाच्या शिफारशीनुसार वाढीव वेतनाचे लाभ मिळण्यासाठी आणखी महिनाभर प्रतीक्षा करावी लागेल. सरकारने सातवा वेतन आयोगाच्या संदर्भात गुरुवारी आदेश जारी केला. सरकारी आदेशाला विलंब झाल्याने कर्मचाऱ्यांना जानेवारीचे वेतन जुन्या वेतनश्रेणीनुसार मिळणार आहे. सरकारने १ जानेवारी २०१६ पासून आपल्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू केला आहे; मात्र त्याचे प्रत्यक्ष लाभ १ जानेवारी २०१९ पासून देण्याचे सरकारने मान्य केले होते. त्यासाठी २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात १० हजार कोटींची तरतूद केली; मात्र वित्त विभागाकडून आदेश जारी करण्यास विलंब झाल्याने आयोगाची अंमलबजावणी लांबणीवर पडली. कर्मचाऱ्यांना फेब्रुवारीचे वेतन सातव्या वेतन आयोगानुसार मिळेल; तर जानेवारीच्या वेतनातील फरक फेब्रुवारीच्या वेतनातून दिला जाईल. तसेच तीन वर्षांतील थकबाकी पाच हप्त्यांत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा होईल, असे सूत्रांनी सांगितले.

# अजित पवारांनी मागितली अण्णांची माफी

**अहमदनगर-** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक यांच्या वक्तव्यामुळे संतप्त झालेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माफी मागितली आहे. 'मलिक यांच्या त्या वक्तव्याशी पक्षाचा काही संबंध नाही. यामुळे हजारे दुखावले गेल्याने आपण दिलगिरी व्यक्त करतो,' असे अजित पवार यांनी नगरमध्ये पत्रकारांशी बोलताना सांगितले.



मलिक यांनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना हजारे संघाचे एजंट असल्याचा आरोप केला होता. त्यावर हजारे यांच्या समर्थकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. हजारे यांनीही याची दखल घेत कायदेशीर सल्ला घेऊन मलिक यांच्याविरूद्ध दावा दाखल करणार असल्याचे म्हटले होते. गुरूवारी सायंकाळी राष्ट्रवादीच्या नेत्यांना हजारे यांनी भेटही नाकारली होती.या पार्श्वभूमीवर पवार यांनी नगरमध्ये दिलगिरी व्यक्त केली आहे. पवार म्हणाले, 'आमचे सरकार सत्तेवर असतानाही हजारे यांनी आंदोलने केली होती.

# आईसह चार वर्षांच्या चिमुरडीचा गळा चिरून खून

**मुंबई-** धारावी परिसरातील शाहू नगर येथील डायमंड अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या महिलेचा तसेच तिच्या चार वर्षांच्या मुलीचा अज्ञात व्यक्तींनी गळा चिरून खून केल्याची घटना उघड झाली. खून केल्यानंतर त्यांचे मृतदेह जाळण्याचाही प्रयत्न करण्यात आला.

धारावीतील डायमंड अपार्टमेंटमध्ये रियाज हुसेन सय्यद हे पत्नी तेहसिन (३४), मुलगी आलिया ऊर्फ फातिमा यांच्यासह राहत होते. गुरुवारी सकाळी तेहसीन आणि फातिमाचा अज्ञात व्यक्तींनी खून केल्यानंतर त्यांचे मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या घरातून धूर येत असल्याचे शेजाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पोलिसांना बोलावले. हे खून कुणी व का केले, याचा तपास पोलिस करत आहेत.




या हत्येमागे तेहसिनचा पती रियाज असल्याचा पोलिसांचा कयास आहे.

दरम्यान, या प्रकरणी शाहू नगर पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस अधिक तपास करत असल्याचे अतिरिक्त पोलिस आयुक्त रविंद्र शिसवे यांनी सांगितले.

# शहिदांच्या कुटुंबीयांना ५० लाख, २ हेक्टर जमीन; शौर्य सेवा पदकधारकांच्या अनुदानात दुपटीने वाढ

**मुंबई-** देशाच्या संरक्षणासाठी प्राण पणाला लावणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबीयांना देण्यात येणारे २५ लाखांचे अनुदान दुपटीने वाढवण्यात आले आहे, आता ही रक्कम ५० लाख असेल. तसेच महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेंतर्गत लष्करात शौर्य गाजवणाऱ्या महाराष्ट्रातील शौर्य तसेच सेवा पदक विजेत्यांच्या अनुदानातही दुपटीने वाढ करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केली.



शहिदांच्या कुटुंबीयांना त्याच जिल्ह्यात शेतीसाठी दोन हेक्टर जमीन देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. याशिवाय शौर्यपदक आणि सेवापदक विजेत्यांसाठी एकरकमी पुरस्काराच्या रकमेतही दुपटीने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मरणोत्तर शौर्य आणि सेवापदक मिळणाऱ्या जवानांच्या कुटुंबीयांना देण्यात येणाऱ्या मासिक अनुदानातही दुपटीने वाढ करण्यात आली आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. अथर्व फाउंडेशनच्या वतीने वरळी येथे आयोजित 'अ ट्रिब्यूट टू इंडियन आर्मी अँड सॅल्यूट टू सोल्जर्स' या कार्यक्रमात ते बोलत होते.

# नौदलात नोकरीचे आमिष दाखवत तरुणाला १४ लाख रुपयांचा गंडा

**लातूर-** नौदलात नोकरी लावतो म्हणून एका तरुणाची १४ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अहमदपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. मूळचा औसा तालुक्यातील याकतपूर येथील दत्तात्रय लखने याच्या घराशेजारी राहणाऱ्या सपना एकनाथ गांजवे, ज्योती एकनाथ गांजवे, दत्तात्रय हजारे, मंगला दत्तात्रय हजारे, अमित हजारे व सूरज गांजवे यांनी दत्तात्रय लखने यास नौदलात नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. या करिता वेळोवेळी पैशाची मागणी केली. २०१५ मध्ये हाडोळती येथे दत्तात्रय लखने यांचे सासरे समक्ष सपना एकनाथ गांजवे, ज्योती एकनाथ गांजवे यांना ५ लाख ५० हजार रुपये दिले. यानंतर १० जानेवारी २०१५ रोजी अहमदपूर येथे २ लाख ५० हजार तर उर्वरित ६ लाख ५० हजार रुपये हे ७ मार्च २०१५ रोजी देण्यात आले होते. सर्व पैसे देऊनही नोकरीबाबत कोणतीच प्रक्रिया होत नसल्याने दत्तात्रय लखने यांनी संबंधितांकडे पैशाची मागणी केली. मात्र, एका महिन्यात नोकरी देण्याचे आश्वासन हवेतच राहत असल्याने आपली फसवणूक झाल्याचे दत्तात्रय याच्या लक्षात आले.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)